महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

बुधवार ❖ ०२ ऑक्टोबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक ०९९ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

## शरद पवार गटाची ताकद वाढणार

### महाराष्ट्रातील प्रदेश बीआरएस पक्ष आता शरद पवार गटात विलीन होण्याचे संकेत




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (वृत्तसेवा) -**

मुंबई : महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीआधी भारत राष्ट्र समिती पक्षाचे अध्यक्ष आणि तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांना मोठा धक्का बसला आहे. महाराष्ट्रातील प्रदेश बीआरएस पक्ष आता शरद पवार गटात विलीन होऊ शकतो, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. राज्यातील बीआरएसचे पदाधिकारी येत्या ६ तारखेला पुण्यात शरद पवार यांच्या उपस्थितीत शरद पवार गटात प्रवेश करतील, असं सूत्रांचं म्हणणं आहे. राज्यातील बीआरएस पक्षाच्या प्रमुख नेत्यांची आज शरद पवार यांच्यासोबत बैठक पार पडली. यानंतर ही माहिती समोर आली आहे.

दरम्यान, ऐन लोकसभा निवडणुकीच्या आधी भारत राष्ट्र समिती पक्ष महाराष्ट्रात दाखल झाला होता. त्यावेळी के चंद्रशेखर राव यांनी स्वतः नागपूरमध्ये येऊन स्वतःच्या पक्षाच्या कार्यलयाचे उद्घाटन केले होते. त्यावेळी चंद्रशेखर राव म्हणाले होते की, ''बीआरएस पक्षाचा उद्देश देशात उच्च दर्जाच्या बदलाची गरज आहे. आम्ही आमची सुरुवात महाराष्ट्रापासून केलीय. यानंतर आम्ही मध्यप्रदेश, राजस्थान असं करत पुढे जाणार आहोत.''

मात्र आता महाराष्ट्रात त्यांच्या पक्ष गाशा गुंडाळण्याचा तयारीत असल्याचं दिसत आहे. यातच तेलंगणा विधानसभा निवडणुकीतही पान ४ वर ▶▶

## महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या पक्षाचा उदय




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) -**

मुंबई : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. त्यामुळे सध्या राजकीय घडामोडी वेगाने सुरु आहेत. महायुती विरुद्ध महाविकासआघाडी अशी लढत विधानसभा निवडणुकीत पाहायला मिळत आहे.

महाविकासआघाडी आणि महायुतीत जागावाटपाच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. तर काही पक्षांकडून उमेदवारांच्या नावाच्या घोषणा होताना दिसत आहे. त्यातच आता महाराष्ट्रात एका नव्या राजकीय पक्षाचा उदय झाला आहे. विशेष म्हणजे या पक्षाची निवडणूक आयोगाकडे नोंदणी झाली असून चिन्हंदेखील ठरलं आहे.

राज्यात नव्याने स्थापन झालेल्या राजकीय पक्षाचे नाव महाराष्ट्र स्वराज्य पक्ष असे आहे. हा पक्ष दुसऱ्या तिसऱ्या कोणाचा नसून माजी खासदार छत्रपती संभाजीराजे भोसले यांचा आहे. छत्रपती संभाजीराजे यांनी नुकतंच फेसबुकवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी याबद्दल संपूर्ण माहिती दिली आहे. तसेच या पोस्टद्वारे संभाजीराजेंनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसाठी रणशिंग फुंकल्याचेही पाहायला मिळत आहे.

स्वराज्य संघटनेचे सर्व कार्यकर्ते, चाहते व हितचिंतक तसेच तमाम महाराष्ट्रवासियांना कळविणेस अत्यंत आनंद होतो की, दि. ०९ ऑगस्ट २०२२ पान ४ वर ▶▶

## ठाणे महापालिकेला हरित लवादाचा दणका

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) -**





ठाणे : देसाई खाडीच्या हद्दीत येत असलेल्या उल्हास नदीच्या पात्रात प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्याची विल्हेवाट लावल्याप्रकरणी ठाणे महापालिकेला तब्बल १०२.४ कोटी नुकसानभरपाई देण्याचे आदेश पुणे हरित लवादाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला दिले आहेत. पर्यावरणीय हानीसाठी ही दंडाची रक्कम ठाणे महापालिकेला भरावी लागणार आहे. मुंब्र्यातील सामाजिक कार्यकर्ते आरिफ इराकी यांनी यासंदर्भात हरित लवादाकडे दाद मागितली होती. नुकतीच यासंदर्भात सुनावणी झाली

असून या सुनावणीमध्ये हरित लवादाने हे आदेश दिले आहेत. इराकी यांनी उल्हास नदी आणि देसाई खाडीत सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे होणारे गंभीर जलप्रदूषण आणि आरोग्याच्या समस्यांबाबत हरित लवादाकडे अर्ज केला होता.

ठाणे पालिकेच्या म्हणण्यानुसार, मुंब्रा येथे दररोज ३५ पान ४ वर ▶▶

## मुरबाडचा सुपुत्र 'बेस्ट सोल्जर' पुरस्काराने सन्मानित



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) -**

मुरबाड : भारतीय लष्करात कर्तव्य बजावत असलेल्या मुरबाडच्या मातीतील सैनिक अनिकेत जयदीप अढाइगे यास सोमवारी (दि.३०) बेस्ट सोल्जर म्हणून सन्मानित करण्यात आले. त्यामुळे मुरबाडच्या शिरपेचात आणखीन एक मनाचा तोरा रोवला गेला असून या वार्तेने तालुक्यात चैतन्याचे वातावरण पाहायला मिळत आहे. फौजी अनिकेत सध्या मणिपूर येथे कर्तव्य बजावत आहे. मणिपूर हिंसाचार नियंत्रित राखण्यासाठी भारतीय लष्कराची महत्त्वाची भूमिका आहेत. जीवाची बाजी लावून सैनिक येथे संरक्षण देत आहेत. याच कामगिरीची दखल घेऊन फौजी अनिकेत यांस बेस्ट सोल्जर हा लष्करी सन्मान प्रदान करण्यात आला आहे. अवघ्या बालपणापासून सैन्य दलात देशसेवेचे ध्येय बाळगून असलेल्या अनिकेतने परिस्थितीवर मात करून अखेर सन २०१९ मध्ये भारतीय सैन्य दलात आपली जागा पटकावली. आर्थिक, मानसिक व तांत्रिक अडचणींमुळे त्याला यापूर्वी काही वेळा अपयश पत्करावे लागले.

मात्र यावर खचून न जाता अनिकेतने आपला सराव कायम ठेवत यशाची वेस गाठल्याने, एका खासगी शाळेत ट्रेनर म्हणून पार्ट टाईम काम करून आपल्या कुटुंब खर्चाला पान ४ वर ▶▶

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

## तिसऱ्या आघाडीचा मुख्यमंत्री मनोज जरांगे पाटील?

### सत्ता आल्यास मनोज जरांगे पाटील मुख्यमंत्री, राजरत्न आंबेडकर यांची माहिती



मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींना वेग आला असताना एक खळबळजनक माहिती समोर आली आहे. एकीकडे राज्याच्या राजकारणात मुख्यमंत्री पदावरुन दावे-प्रतिदावे आणि पक्षांतर्गत वाद रंगत असताना तिसऱ्या आघाडीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा ठरला आहे. याबाबतची अधिकृत घोषणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू राजरत्न आंबेडकर यांनी केली आहे. राजरत्न आंबेडकर यांनी तिसऱ्या आघाडीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा म्हणून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नावाची घोषणा केली आहे. त्यामुळे आगामी काळात राज्यात तिसऱ्या आघाडीला कितपत यश मिळतं आणि हा प्रस्ताव मनोज जरांगे पाटील स्वीकारतात का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

तिसऱ्या आघाडीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा ठरला!

महाविकास आघाडी आणि महायुतीनंतर राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तिसरी आघाडी होऊ पाहत आहे. या आघाडी बाबत बोलताना राजरत्न आंबेडकर यांनी आमच्या आघाडीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा मनोज जरांगे असतील अशी माहिती दिली आहे. ते आज हिंगोली जिल्हा दौऱ्यावर होते. तेव्हा माध्यमांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली आहे. तर दुसरीकडे पान ४ वर ▶▶

## ऐतिहासिक वारसा जपणे सर्वांचे कर्तव्य -पालकमंत्री रविंद्र चव्हाण





पालघर : आपल्याला लाभलेले शौर्याचे स्मरण करून देणारे गड, कील्ले हे आपल्या देशाची अमुल्य संपत्ती असून या ऐतिहासीक वारसाला जपणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी केले. जिल्हा नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय, येथे शिरगांव येथील शिरगाव किल्ला या राज्य संरक्षित स्मारकाचे जतन व दुरुस्ती कामाचे भूमिपूजन तसेच जव्हार येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे भगवान बिरसा मुंडा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामांतरण दूरदृष्य प्रणालीद्वारे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी पालकमंत्री रविंद्र चव्हाण बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, माजी खासदार राजेंद्र गावित, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे तसेच पान ४ वर ▶▶

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

## ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आदिवासींचे उलगुलान



ठाणे : राज्य सरकारने धनगर समाजाला आदिवासी (एसटी) प्रवर्गात म्हणजेच अनुसूचित जमातीअंतर्गत आरक्षण देण्यासाठी समिती गठीत केली आहे, असा आरोप करून त्याच्या निषेधार्थ व अनुसूचित जमाती प्रवर्गात धनगरांचा समावेश करू नये, या मागणीसाठी आज संयुक्त आदिवासी आरक्षण हक्क कृती समितीच्यावतीने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर पारंपारिक वेशभूषेत व तारा नृत्य करीत मोर्चा काढला. या मोर्चे करांच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी संदीप माने यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन दिले. यावेळे उपस्थितांना मार्गदर्शन करताना संयुक्त आदिवासी आरक्षण हक्क कृती समितीचे निमंत्रक अनिल भांगले, सुनील झडके आणि हंसराज खेवरा यांनी 'धनगर समाजाला आदिवासी जमातींमध्ये समाविष्ट करून बेरजेचे राजकारण कराल तर आम्ही ८५ मतदारसंघात वजाबाकीचे राजकारण करू असा गंभीर इशारा यावेळी दिला. १५ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र सरकारने धनगर समाजाचा पान ४ वर ▶▶

## अंबरनाथ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी एमबीबीएसच्या १०० जागा मंजूर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) -**

ठाणे : केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून अंबरनाथ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता एमबीबीएसच्या १०० जागांना मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे तसेच स्थानिक आमदार डॉ.बालाजी किणीकर यांनी विशेष प्रयत्न केले, अशी माहिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.संतोष वर्मा यांनी दिली आहे.


भविष्यात डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांना याचा विशेष लाभ होईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र राज्य बेंच प्रेस स्पर्धेत मिलिंद खळदकर मास्टर्स गटामध्ये द्वितीय




कल्याण : मुंबई वडाळा येथे महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन तर्फे ३३ व्या महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर, ज्युनिअर, सीनियर व मास्टर्स गटांमध्ये बेंच प्रेस अजिंक्यपद स्पर्धा नुकतीच आयोजित केली होती. या स्पर्धेत महाराष्ट्रातील सातारा, ठाणे ,पुणे ,सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, लातूर, रायगड इत्यादी १७ जिल्ह्यातून ४०० स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत ठाणे जिल्ह्यातून निवड झालेल्या कल्याण येथील बालक मंदिर संस्थेच्या कॅ.रवींद्र माधव हायस्कूल शाळेतील सहाय्यक शिक्षक मिलिंद खळदकर यांनी मास्टर्स गटामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त करून रौप्य पदक प्राप्त केले.

# भारत शब्दातून साकारले महात्मा गांधी यांचे रेखाचित्र




कल्याण : सत्य आणि अहिंसा यांचे प्रतीक महात्मा गांधी यांच्या १५५ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला प्रेरक वक्ते प्रा. डॉ. दिनेश गुप्ता यांनी एक अनोख्या कलेतून महात्मा गांधींना श्रद्धांजली वाहिली आहे. दिनेश गुप्ता यांनी 'भारत' या शब्दाचा वापर करून महात्मा गांधी यांचे रेखाचित्र तयार केले आहे. या विशेष कलेला टायपोग्राफी ड्रॉइंग आर्ट म्हणतात, ज्यात शब्दांचा वापर करून चित्र रेखाटले जाते. गुप्ता यांनी गांधीजींच्या विचारांनी प्रेरित होऊन हे अनोखे चित्र तयार केले आहे.

# युवा संस्कार संस्थेचे संस्थापक सोमनाथ राऊत यांना 'कुणबी समाज भुषण पुरस्कार'



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**


कल्याण : कोकणातील कुणबी समाजातील विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांचा कुणबी समाज भूषण पुरस्कार देऊन एकीकरण समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सत्कार केला जातो. यावर्षी सोमनाथ राऊत या ठाणे जिल्ह्यातील कल्याण, मुरबाड, शहापूर तालुक्यात शिक्षण, आरोग्य, सांस्कृतिक विषयावर काम करत असलेल्या युवकाचा कुणबी समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.


ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात गेल्या १५ वर्षा पासुन आदिवासी पाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी सोमनाथ काम करत आहे. आदिवासी पाड्यात सातत्याने विविध पातळीवर जनजागृतीचे काम सोमनाथ करत आहे. या कार्यक्रमात कला, सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या युवकांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे निलेशजी सांबरे, पंकज पवार, अजीत जाधव आदी उपस्थित होते.




# व्यसन तरूणांना लागलेली कीड





**- डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

मादक पदार्थांच्या सेवनाच्या बाबतीत संवयं हा शब्द वापरला जातो. व्यसनाधीन' हा शब्द या संदर्भातच योजिला जातो. मादक पदार्थाच्या सेवनामुळे रक्तवाहिन्यांद्वारे संवेदना शरीरभर पसरतात. ही नशा उत्तरल्यावर पुन्हा त्या पदार्थांच्या सेवनाची इच्छा होते. अशा प्रकाराची वारंवारिता म्हणजे व्यसन जडणं हाय. व्यसनाधीन तरुण, दिशाहीन तरुण देशाचा शाप आहे. व्यसनाधीनता ही जागतिक समस्या आहे. त्यावरून समाजाचे चार प्रकार पाडता येतील. तंबाखू व गुटखा खाऊन धुंकणारा समाज, तपकीर नाकात खूपसून शिंकणारा समाज, सिगारेट व बिडी ओढून धूर काढणारा असा भुंकणारा समाज आणि दारू अफू, गांजा, चरस यांसारखी कैफ आणणारी मादक, गोळ्या व औषधी द्रव्ये सेवन करणारा मद्यासक्त, झिंगणारा नशाबाज समाज! व्यसनाधीनतेची कीड आजच्या तरुणाईमध्ये कां वाढत आहे, त्याची कारणे व उपाय शोधणेही आवश्यक आहे. १९८८ सालापासून जगात ३१ मे हा दिवस जागतिक तंबाखू विरोधी दिन म्हणून पाळण्यात येतो. तंबाखूएवढी लोकप्रियता दुसऱ्या कोणत्याही वनस्पतीला लागली नाही. तंबाखूच्या सेवनामुळे केर्क रोगासारखा भयानक रोग होऊ शकतो. तंबाखूमध्ये निकोटीन हा पदार्थ असतो. त्यामुळे हृदयाचे ठोके वाढतात, रक्तदाब वाढतो, रक्तवाहिन्या अरुंद होतात. जननेंद्रियांवर अनिष्ट परिणाम होतो; त्यामुळे नपुंसकत्व येते. पाचकशक्ती व रक्ताची रासायनिक स्थिती बिघडून पोटात आग होणे, घसा सुकणे, खोकला येणे, मज्जा- पेशी निकामी होणे इत्यादी प्रकार होतात. गुटख्यातील चुना, सुपारी, सुगंधी द्रव्ये इशरीराला अत्यंत अपायकारक असतात. त्यांमुळे तोंडात पुरळ येतात. अशा प्रकारे गुटका खाणाऱ्यांच्या तोंडात पुरळ येणं हे कर्क- रोगाचे पहिले लक्षण होय. दूरदर्शनवर गुटखा खाणारा नायक दारखखला जातो. अशा कुसंस्कार करणाऱ्या जाहिरातींवर बंदी घालणे आवश्यक आहे. तथापि तंबाखू प्रसारक संदेशांना बळी पडू नका असा इशारा केंद्रीय आरोग्य विभागाने दिला आहे.

केंद्रिय आरोग्य विभागाचे आभार!

तंबाखू, गुटखा खाऊन भररस्त्यात, रेल्वे फलाटावर बसस्टँडवर सामुदायिक ठिकाणी थुंकणारे पाहिले की, तळपायाची आग मस्तकात जाते. थुंकी उडाल्याने भांडणेही होतात. तीच अवस्था तपकीर हुंगून इतरांवर शिंकणाऱ्याऱ्यांची होते. तपकीर व मशेरीने दात घासून थुंकणारे पाहिले की, किळस निर्माण होते. अतिधुम्रपान करणाऱ्या तरुणांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण जास्त आहे. सिगारेट ओढणाऱ्यांमध्ये फुफ्फुसांच्या कर्करोगाचे प्रमाण जास्त असते. महागडी सिगारेट परवडत नाही; म्हणून कामगार विडी ओढतात. खेड्यापाड्यातील गडी माणसे, शेतमजूर विडी ओढतात, खोकला लागतो तरी ते विडीचे व्यसन सोडत नाहीत. तंबाखूमुळे दरवर्षी भारतात १३५ लाख माणसे? मृत्यु पावतात. 'दारूची नशा करी; संसाराची दुर्दशा! सर्वभूत असूलेले हे विधान दारूचे व्यसन जडलेल्या तरुणांना उद्देशून नमूद केले आहे.

मद्याच्या आहारी गेलेल्यांना मद्याशिवाय जगणे कठिण होते. त्याच्या अभावी बेचैन होणे म्हणजेच मद्यासक्ती होय. दारूमध्ये जो प्रमुख रासायनिक घटक असतो त्याला 'अल्कोहोल' असे म्हणतात. अल्कोहोलचे प्रमाण वाढू लागले की, त्यातून विकृत वर्तनाला प्रारंभ होतो. त्यामुळे मेंदूची विचारक्षमता, नियंत्रणक्षमता मंदावते. अशा मानसिक विकृती आढळतात.

'एकच प्याला' या राम गणेश गडकरी यांनी, लिहिलेल्या नाटकात सुधाकर या उच्चशिक्षित तरुण वकीलाचा संसार दारूमुळे कसा धुळीस मिळतो, याचे स्पष्ट चित्र उभे केले आहे. अलीकडच्या काळात तरुण-तरुणींचे मद्यप्राशन करून वाहन चालवण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. त्याचे सामाजिक दुष्परिणाम तर दिसतातच, शिवाय त्या व्यक्तींमध्ये मानसिक विकृतीही निर्माण होते. पुण्यातील कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन कार चालक मुलगा हीट अँड रन' संदर्भात सद्या चर्चेत आहे. मद्यपान करून पोरी कार भरधाव चालवून दोन व्यक्तींच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेच्या अल्पवयीन मुलाचे वडील विशाल अगरवाल व आई शिवानी अगरवाल यांना अटक करण्यात आली आहे. पैशाच्या जोरावर अगरवाल कुटुंब कायद्याला विकत घेऊ पाहात होते. पीढी बिघडली म्हणण्यापेक्षा ती बिघडू नये, यासाठी प्रबोधन करण अधिक महत्त्वाचे आहे. कायद्याचा धाक तरुणांना असायलाच हवा. पालकांच्या कुसंस्कारांमुळे अल्पवयीनांना व्यसनांची कीड लागू शकते.

मद्यासक्तीप्रमाणेच औषध व्यसनासक्ती (ड्रग ॲडिक्शन) हे सेवन करणारी व्यक्ती व समाज या दोघांनाही विघातक आहे. याचा संबंधः अफू गांजा, चरस, मॉर्फिन यांसारख्या गोळ्या व औषधी द्रव्ये कैफ आणणारी असतात. तसेच निकोटाईन, कोकेन, कॅफेन यांसारख्या उत्तेजक द्रव्यांच्या व्यसनामुळे माणूस शारीरिक व मानसिकदृष्ट्या परावलंबी होतो. दीर्घकाळ घेत राहिल्यास भूक मंदावते, पोट बिघडते, वजन कमी होते, निद्रानाश होतो, बौध्दिक कार्यक्षमता हळू- हळू कमी होऊ लागते आणि मानसिक विकृती निर्माण होते. चित्तभ्रम होतो.

२६ जून हा जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन आहे. ड्रग्जच्या व्यापारामुळे भ्रष्टाचार, हिंसाचार फैलावतो हे सिद्ध झाले आहे. समाज व अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा अमली पदार्थाचा गैर अवैध व्यापार ही आज जगभरातील महत्त्वाची समस्या आहे. व्यसनी तरूण ड्रग्ज मिळविण्यासाठी पैसा लागतो व ते पैसे कमविण्यासाठी व्यसनाधिनतेच्या आहारी गेलेली मुले हिंसाचार करतात. नशेची तल्लफ असह्य होऊन इतकी पराकोटीला जाते की ही मुले प्रसंगी स्वतःच्या शरीरावर अत्याचारही करतात. अमली पदार्थ सेवनाने गंभीर आजार होतात. रक्तवाहिन्यांमधून इंजेक्शनच्या सहाय्याने घ्यावयाच्या ड्रग्जमुळे एचआयव्ही सारख्या संसर्गजन्य आजाराचे विषाणू शरीरात जाऊन एड्ससारखे असाध्य रोग होऊ शकतात. अमली पदार्थ हे मानसिक, सामाजिक व वैद्यकीय संकट आहे. कारण असे पदार्थ तरुणांच्या व्यक्तीमत्वावर विपरीत परिणाम घडवून आणतात.

तरुण मुले-मुली आणि किशोरवयीन मुले-मुली यांना व्यसनाधिनतेच्या संदर्भात प्रबोधन करण्याची, समुपदेशन करण्याची अन्यंत गरज आहे. दारूला व अमली पदार्थाला सामाजिक मान्यता मिळायला नको. कोणतीही पार्टी दारुशिवाय होत नाही. कुठचेही व्यवहार दारूशिवाय होत नाहीत दारू, पिणे हे मर्दानगीचे लक्षण मानले जाते. आजचा समाज नैतिकदृष्ट्या अधःपतित झालेला आहे. त्याचे कारण म्हणजे इंटरनेट! इंटरनेच्या मायाजालात-आंतराळात सहज उपलब्ध असणारे हिंसात्मक असे गेम्स, (अश्लील साहित्य) व पोर्न व्हिडिओज् वेबसिरीजमधून व्यसनांचे होणारे सर्रास उदारीकरण!

मानसोपचार तज्ज्ञांच्या मते किशोरवयीन व तरूण मुले, त्या टप्प्यावरील चढ-उतारांशी जुळवून घेण्यासाठी आधार आणि दिलासा मिळावा या हेतूने तंबाखूकडे एक साधन म्हणून पाहतात. म्हणून संबाखू, सिगारेट, दारू या व्यसनापासून मुक्त होण्यासाठी शारीरिक तल्ल फ लागण्यावर उपाय शोधणे ही काळाची गरज आहे. तथापि या वर्तनाला कारणीभूत ठरणाऱ्या सामाजिक व मानसिक घटकांवरही उपाय शोधणे गरजेचे आहे. निकोटिन रिप्लेसमेंट थेरपी, समुपदेशन आणि तज्ज्ञ मानसोपचारतज्ज्ञांकडून व्यसनमुक्ती तंत्रांचा उपयोग केल्याने तंबाखूचे व्यसन सुटण्यासंदर्भान यशस्वी परिणाम दिसून आले आहेत. दारू प्याल्यामुळे ताण तणावांपासून मुक्ती मिळेल, असे तरुणांना वाटते. कडक शिस्तीमुळे ताणतणाव निर्माण होत असतात. नैराश्यावर उपाय म्हणूनही तरुण दारू पितात, सिगारेट ओढतात. अशा वेळी घरातील माणसांचा एकमेकांशी सुसंवाद हवा. ते एकत्र बसून जेवणही करत नाहीत. एकत्र आले तरी प्रत्येकाच्या हातात मोबाईल असतो. पालकांना माहीत असले पाहिजे की आपल्या मुलाचे, मुलीचे मित्र-मैत्रिणी किती आहेत व कोण आहेत. ते किती तास बाहेर आहेत आणि कोणाबरोबर कोणत्या हेतूने थांबले आहेत. वाईट संगतीमुळे, गरजेपेक्षा जास्त पैसे मिळाल्यामुळे, मोकळ्या वेळेत काही तरुण, तरूणी ऑनलाइन गेमच्या इतके आहारी जातात की, ते स्वतःचे जीवन स्वतःच उद्धवस्त करून टाकतात. या व्यसनांमुळे आत्महत्या करतात. कोवळया वयातच मृत्यूला कवटाळतात. कारण- संग जया जैसा, लाभ तया जैसा। होतसे अपैसा ! अनायासेमी (इति श्रीसंत तुकाराम महाराज) जगामध्ये भारत देशाचे महत्त्व वाढत आहे. मात्र भारत तंबाखू सेवनाच्या वाढत्या आव्हानाचा सामना करत आहे. २०२० मध्ये १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील २७ टक्के व्यक्ती तंबाखूचे सेवन करणारे होते, असे आढळून आले आहे. आणि १२० दशलक्षदून अधिक प्रौढ धुम्रपान करणारे आढळले. सध्या -जवळजवळ २६७ दशलक्ष व्यक्तींच्या जीवनावर तंबाखूजन्य आजारांचा परिणाम दिसून येत आहे तंबाखूचा धूरही विषारी असतो विशेष अहवालावरून असे स्पष्ट दिसून आले आहे की, २० ते ४४ वर्षे वयोगटा - तील तरुणांमध्ये धूम्रपानाचे प्रमाण हा चिंतेचा विषय आहे. शुमारे ५४ टक्के व्यक्ती सिगारेट व विडसिट धुम्रपान करतात. जागतिक आरोग्य संघटनेचा अहवालः सन २०१५ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने असे नमूद केले आहे की, तंबाखू सेवनामुळे होणारे आजार व अकाली मृत्यू यांमुळे भारताच्या संकन देशांतर्गत उत्पादनामध्ये जवळपास १ टक्का एवढे नुकसान होते तंबाखू संबंधित आजारांचा उपचार करतांना देशातील आरोग्य खचर्चामध्ये जवळजवळ ५.३ टक्के एवढा खर्च होतो. साधारणपणे १३,५०० कोटी रूपये अनाठायी खर्च होतो तंबाखू सेवनावर नियंत्रण ठेवणाऱ्या प्रभावी धोरणांचे अवलंबन केल्यास हे नुकसान मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. भारतात कर्करोग आणि फुफ्फुस संबंधी विघ्नकारी जुनाट रोग (क्रोनिक ऑबस्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसिज्) सारखे असंसर्गजन्य आजार कमी करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे देशात शाश्वत विकासाला गली मिळू शकते.

हैदराबाद येथील सल्लागार इंटरव्हेंशनल पल्मोनोलॉजिस्ट आणि क्रिटिकन केअर स्पेशलि करच्या अभ्यासकांनी म्हटले आहे की, धुम्रपान सोडल्याने आरोग्य चांगले सुधारते आणि सकारात्मक बदल घडून येतात.. पब आणि क्लब संस्कृती नाहीशी करणे हा त्यावर उत्तम उपाय आहे, असे वाटते. आजच्या तरुणाईला व्यसनाधीनतेपासून दूर ठेवायचे असेल तर त्यांना जिवनाचा मूळ उद्देश समजावून सांगणारे माता पिता हवेत. व्यसनाची कीड लागू नये म्हणून तरूणांना असे घर हवे आहे, जिथे सुसंवाद व सुसंस्कार असतील, जिथे प्रेम-जिव्हाळा असेल, जिथे वेळ देणारी मायेची माणसं असतील! संत कबीरांनी जीवनाचे तत्त्वज्ञान एका सुंदर दोहयात मांडून ठेवले आहे, कबीरदास म्हणतात -

**करे बुराई सुख चहै ,कैसे पाये कोय**
**बोया पेड बबुलका, आम काँ ते होया।**

अर्थः बाभळीच बी पेरल्यानंतर अंब्याची अपेक्षा करून चालणार नाही. त्याला काटेंच येणार, अर्थात आंबे हवे असतील तर आंब्याची कोय लावणे हाच उत्तम उपाय होय.

# डिजीटल युगातील देवीभोयरे केंद्र शाळेने मिळविला नावलौकिक

देवीभोयरेः डिजीटल युगात विद्यार्थ्यां चा बौद्धिक व शारीरिक क्षमता ओळखून विकास होण्याबरोबरच हस्ताक्षर लेखन , बचतीस वा इतर बाबींकडे महत्त्व सातत्याने प्राधान्य देणारी देवीभोयरे येथील जिल्हा परिषदेची केंद्रशाळेने उपक्रमशिल शाळा म्हणून पारनेर तालुक्यात नावलौकिक मिळविला आहे.

या केंद्रशाळेत इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी पर्यंत सुमारे २३० विद्यार्थी शिक्षण घेतात व त्यांना ज्ञान दान करणारे मुख्याध्यापकांसह ९ उपशिक्षक कार्यरत आहेत . या शाळेत मुलांच्या बौध्दिक विकासा बरोबर शारीरिक विकास साधण्यासाठी विविध खेळ , योगा व प्राणायाम घेतले जातात .तसेच वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक दही हंडी उत्सव व समाजाभिमुख उपक्रमां बरोबर स्पर्श ज्ञान व मुलींचे




स्वसंरक्षणाचे धडे व आत्म प्रेरणा या बाबत मार्गदर्शन केले जाते आणि लहान पणापासून बचतीची प्रेरणा मिळावी व पैसे बचतीची सवय लागावी , म्हणून शाळेत विद्यार्थ्यांची बचत बँक योजना चालू करण्यात आली आहे .डिजीटल युगात सुद्धा मुलांचे हस्ताक्षर सुधारणे , सुंदर व वळणदार पद्धतीने काढणे , यासाठी उपक्रम राबवले जातात . अशा प्रकारे पारनेर तालुक्यातील एकमेव उपक्रमशिल जिल्हा परिषदेची शाळा म्हणून देवीभोयरे च्या या केंद्रशाळे पाहिले जाते . विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधणारी कृतिशिल व नाविन्य पूर्ण उपक्रमशिल अशी पारनेर तालुक्यातील एकमेव शाळा आहे . येथे विद्यार्थ्यांना खेळाची आवड निर्माण होवून विविध खेळ खेळण्यासाठी प्रशस्त क्रिडागंण सुसज्य परस बाग , मुलांसाठी खेळणी आणि बाह्यांग विविध रंगांने सजविलेले , रंगवलेली संरक्षण भिंत आहे , त्याचबरोबर शाळा खोल्या अंतरंग रंगरंगोटी व डिजिटल युक्त आहे . येथील शिक्षक ही विद्यार्थ्यांना अतिशय सोप्या पद्धतीने शिकवितात की , विद्यार्थ्यांचा ही अभ्यासाकडे कल वाढला आहे .

# जीवनदीप महाविद्यालयाच्या पुजा राऊत आणि दर्शन पवार यांची ज्युडो स्पर्धेत विशेष कामगिरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

पनवेल : जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी सी.के.टी महाविद्यालय आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन ज्युडो स्पर्धा मुंबई क्रिडा संकुल, मरीन लाइन्स येथे दिनांक १/१०/२४ रोजी संपन्न झाली. या स्पर्धेत जीवनदीप महाविद्यालय गोवेलीच्या विद्यार्थ्यांनी विशेष कामगीरी केली. कु.पुजा राऊत आणि दर्शन पवार या विद्यार्थ्यांनी ज्युडो स्पर्धेत




कांस्य पदके मिळविले .त्यांच्या या कामगीरी बद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंदे, संचालक प्रशांत घोडविंदे, प्राचार्य डॉ. के. बी कोरे उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे क्रीडा प्राध्यापक मोहनिष देशमुख यांनी कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत

# मुंबई विभागातील ८०० ज्येष्ठ नागरिक अयोध्येला जाणार

नवी मुंबई ; सामाजिक न्याय विभागाच्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजने अंतर्गत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे या जिल्हयातील ८०० ज्येष्ठ नागरिक ०४ ऑक्टोबर २०२४ रोजी अयोध्येसाठी विशेष ट्रेन ने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) सीएसटी येथून रवाना होणार आहेत. राज्यातील सर्व धर्मीयांमधील ज्येष्ठ नागरीक जे ६० वर्ष किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत त्यांना तिर्थक्षेत्रांना भेट देण्याची इच्छा पुर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजना सुरू करण्यात आलेली आहे. यामध्ये भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्रातील ६६ तीर्थस्थळांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत मुंबई विभागातील मुंबई शहर या जिल्हयातून १५०, मुंबई उपनगर या जिल्हयातून ३०६ व ठाणे जिल्हयातून ४७१ इतके अर्ज अयोध्येला जाण्यासाठी प्राप्त झाले आहेत. यापैकी पहिल्या टप्यातील मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे या जिल्हयातून ८०० ज्येष्ठ नागरिक अयोध्येसाठी जाणार आहेत.

यासाठी सदर विशेष ट्रेन ०४ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ०१:३० वाजता मुंबई येथून रवाना होईल व ०८ ऑक्टोबर २०२४ रोजी अयोध्येतून मुंबईला परत येईल. सदर योजनेसाठी उत्पनाची अट २.५ लाख आहे. वैद्यकीय दाखला, वयाचे ६० वर्ष पूर्ण इ. अटी आहेत. या योजनेअंतर्गत मुंबई विभागातून ज्येष्ठ नागरिकांचे दिक्षाभूमी नागपूर, अजमेर, महाबोधी मंदीर गया, शेगाव, पंढरपूर इ. साठी मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयातून एकूण २५०५ अर्ज प्राप्त झाले आहेत. यासंबंधी नियोजन सुरू आहे. तरी, ज्येष्ठ नागरिकांनी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण या कार्याल यांशी संपर्क साधावा. असे प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.




०२ ऑक्टोबर २०२४
बुधवार

**मेष**
कामाबाबत काही नवीन कल्पना मिळू शकतात. तुम्ही त्यांच्यावर लवकरच काम सुरू करू शकता.आजचा दिवस फायदेशीर असणार आहे.

**वृषभ**
नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना आज एखाद्या कंपनीकडून मेल येऊ शकतो. वैवाहिक जीवनात आज गोडवा राहील. स्पर्धेची तयारी सुरू ठेवावी.

**मिथुन**
नवीन कामाचा विचार करू शकाल. नवीन नातेसंबंधातून तुम्हाला फायदा होण्याची अपेक्षा आहे. ऑफिसमध्ये सर्वांशी चांगला ताळमेळ राहील.

**कर्क**
तुमच्या करिअरमधील चढ-उतारांमुळे तुम्ही त्रस्त असाल, परंतु काही अनुभवी वरिष्ठांच्या मदतीने तुम्हाला आराम मिळेल. मुलांसोबत चांगला वेळ घालवाल.

**सिंह**
शिक्षकांसाठी आजचा दिवस सामान्य असेल.भावंडांशी संबंध सुधारतील. जोडीदार तुमच्या बोलण्याने प्रभावित होईल. व्यवसायात दिवस चांगला जाईल.

**कन्या**
नवीन स्त्रोतांकडून अचानक आर्थिक लाभ झाल्यामुळे तुमची आर्थिक परिस्थिती संतुलित होईल. प्रियकरासाठी आजचा दिवस अनुकूल असेल.

**तूळ**
नोकरी करणाऱ्या लोकांना बढतीची संधी मिळेल. ऑफिसमध्ये चांगल्या काम गिरीसाठी तुमचा सन्मान होऊ शकतो. नियोजित कामे वेळेवर पूर्ण होतील.

**वृश्चिक**
संध्याकाळपर्यंत एखादी चांगली बातमी मिळाल्याने घरात आनंदाचे वातावरण निर्माण होईल.भावंडांशी तुमचे संबंध सुधारतील.

**धनु**
योग्य दिशेने केलेल्या मेहनतीचे तुम्हाला पूर्ण फळ मिळेल. दिवस संमिश्र राहील. पैशाचे व्यवहार टाळावेत. गणेशजींचा आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहील.

**मकर**
आयुष्यातील सर्व समस्या दूर होतील. कुटुंबा समवेत वेळ घालवाल. महिलांसाठी दिवस खूप खास आहे. दिवसातील वेळ खरेदीमध्ये घालवाल.

**कुंभ**
तुमचा जोडीदार तुमच्या बोलण्याने प्रभावित होईल. व्यवसायात दिवस चांगला जाईल.कुटुंब आणि नातेवाईकांसोबत आनंदात वेळ घालवाल.

**मीन**
कोणावरही विश्वास ठेवू नका आणि स्वतःचे निर्णय सर्वांपेक्षा वर ठेवा. तुमच्या बजेटपेक्षा जास्त खर्च केल्याने आर्थिक समस्या निर्माण होतील.

# स्वच्छतेची सुरुवात स्वतः पासूनच करावी

## - केडीएमसी आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़



दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -

कल्याण : स्वच्छतेची सुरुवात स्वतः पासूनच करावी, असे आवाहन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी आज केले. 'स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत महापालिका व पर्यावरण दक्षता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण मधील शालेय विद्यार्थ्यांसाठी घनकचरा जनजागृती व 'पर्यावरण चित्रपट महोत्सव २०२४' चे आयोजन प्र.के.आचार्य अत्रे रंगमंदिर येथे करण्यात आले होते. त्यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधताना महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी हे आवाहन केले.

आपल्या घरी व आपल्या आजूबाजूला देखील स्वच्छता राखण्याबाबत विद्यार्थ्यांनी स्वतःहून पुढाकार घेवून जनजागृती केली, तर आपला परिसर, आपले शहर स्वच्छ व सुंदर होण्यास मदत होईल.

कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रत्येकाने रिड्यूस, रियूज, रिसायकलचा अवलंब करावा असेही त्या पुढे म्हणाल्या. या कार्यक्रमाची सुरुवात स्वच्छतेची शपथ घेवून करण्यात आली. तद्नंतर उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना जैवविविधतेचे अनोखे दर्शन घडविणा-या जनजागृतीपर लघुचित्रफिती दाखविण्यात आल्या.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांनी घरगुती घातक कचरा, सॅनेटरी कचरा, प्लास्टीक कचरा, सुका कचरा व ओला कचरा म्हणजे काय ? तो कसा व कशासाठी वेगळा करणे आवश्यक आहे याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे सादरीकरण करुन विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले आणि विद्यार्थ्यांमध्येही घनकच-याबाबत जनजागृती केली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, पर्यावरण दक्षता मंडळाचे मॅनेजिंग डायरेक्टर मिलींद मराठे, कार्यकारी अभियंता प्रमोद मोरे, सहा.आयुक्त प्रिती गाडे, पर्यावरण दक्षता मंडळाच्या रुपाली शाईवाले उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दत्तात्रय लदवा यांनी केले. विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहुन या कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद दिला.

# बिर्ला महाविद्यालयात 'स्टार्टअप मेळा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद




दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -

कल्याण : बी.के. बिर्ला रात्र महाविद्यालयाच्या उद्योजकता सेल अंतर्गत 'स्टार्टअप मेला' हा विशेष कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील अनेक स्टॉल्स लावण्यात आले होते, जिथे विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडत्या उत्पादनांचे प्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन बी.के. बिर्ला रात्र महाविद्यालयाचे संचालक डॉ. नरेश चंद्र आणि प्राचार्य डॉ. बिपीनचंद्र वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांनी स्टॉल्सना भेट देऊन स्टॉल धारकांना उत्साह व प्रेरणा दिली,

ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पकतेला वाव मिळाला.

उद्योजकता सेलचे प्रभारी डॉ. रुपेश पाटील आणि सर्व शिक्षक यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. समन्वयक म्हणून धरणी मुडलियार व दर्शन दुबे, तसेच सोशल मीडिया समन्वयक अथर्व जाधव व लक्ष्मी सिंह यांनी कार्यरत राहून कार्यक्रमाचे व्यवस्थापन उत्कृष्टपणे केले. या स्टार्टअप मेळयाचा मुख्य उद्देश सर्व विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ प्रदान करणे हा आहे, ज्याद्वारे त्यांना त्यांच्या कौशल्यांचा प्रदर्शन करण्याची संधी मिळेल. या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या व्यवसायाची स्थापना करण्यासाठी आवश्यक साधनांची माहिती आणि अनुभव मिळू शकेल, ज्यामुळे भविष्यात ते यशस्वीपणे उद्योजक म्हणून कार्यरत राहू शकतील.

या कार्यक्रमात दोन हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी स्टॉल्सना भेट दिली. सर्व उत्पादनं यशस्वीरित्या विकली गेली असून, स्टॉलधारकांना अनेक ऑर्डरही प्राप्त झाल्या. यामुळे स्टॉलधारक अत्यंत आनंदित आहेत आणि बी.के. बिर्ला रात्र महाविद्यालयाने त्यांना एक व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून ते आपले करिअर उज्ज्वल बनवण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास सक्षम होतील.

# व्यंगचित्रकार महेंद्र पंडित यांच्या 'रिफ्लेक्शन' पुस्तकाचे प्रकाशन

## पुस्तकाचे प्रकाशक तथा शिवसेना उबाठा ज्येष्ठ सल्लागार श्री बाळ हरदास यांचा ८० वा वाढदिवस साजरा





दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -

कल्याण ; ज्येष्ठ शिवसैनिक व कल्याणातील प्रसिद्ध उद्योगपती श्री. काका हरदास व मूर्तिकार तसेच कट्टर शिवसैनिक दिनेश शेटये या दोन शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी प्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री महेंद्र पंडित यांच्या चित्र पुस्तकाचे प्रकाशन आणि या पुस्तकाचे प्रकाशक तथा शिवसेना (उ.बा.ठा.) ज्येष्ठ सल्लागार व कामगार, माजी नगरसेवक श्री बाळ हरदास यांच्या ८० व्या वाढदिवसाच्या सोहळयाच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रविवारी रेलीश हॉटेल कल्याण पश्चिम येथे अगदी निवडक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले होते.

जगप्रसिद्ध डच चित्रकार विन्सेंट व्हॅन गॉग यांच्या प्रभाववादी शैलीत सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार महेंद्र पंडित यांच्या कुंचलातून हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विविध मूड्स टिपणारे रिफ्लेक्शन या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा गणेश तरतरे एच.ओ.डी .सर जेजे आर्ट्स ऑफ स्कूल मुंबई, यांच्या अध्यक्षतेखाली व सुप्रसिद्ध चित्रकार अर्क चित्रकार लेखक कवी श्री विजयराज बोधनकर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच तेथील उपस्थित त्यांना रिफ्लेक्शन या पुस्तकांचे वाटपही करण्यात आले.त्यानंतर श्री बाळ हरदास यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त ८० दिवे उजळवून त्यांना त्यांच्या बहिणीने व कुटुंबीयांनी औक्षण केले आणि अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. प्रकाशनाच्या वेळी आपल्या भाषणात बोलताना बाळ हरदास यांनी सगळयांचे आभार मानत आपल्या भावनांना वाट मोकळी केली. काका हरदास यांनी घेतलेली मेहनत या गोष्टींचा उल्लेख केला त्यातूनच हे बंधुप्रेम समाजाला एक दिशा देईल.

प्रकाशन सोहळयाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेश तरतरे तसेच प्रमुख पाहुणे विजय बोधनकर यांच्या हस्ते उपस्थित असलेले कला तपस्वी यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ आणि सन्मान चिन्ह देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. यामध्ये मूर्तिकार प्रशांत गोडांबे, राजेश पवार, मधुकर भामरे ,डॉक्टर व शिक्षण सम्राट साद काझी, डॉक्टर पाटील, एडवोकेट जयेश वाणी, मूर्तिकार दिनेश शेटे, यांचा समावेश आहे तसेच परदेशात उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या कुमारी इशिता हरदास यांचा सत्कार गणेश विद्यामंदिर या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ ललिता मोरे यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते त्यामध्ये महाराष्ट्राचे कवी प्रशांत मोरे, शिक्षण महर्षी डॉ गिरीश लटके, काका हरदास व बाळ हरदास यांचे मित्र विश्वनाथ खताते मुंबईहून खास कार्यक्रमासाठी आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रशांत मोरे यांच्या कवितेने उपस्थितांचे मन भारावून टाकले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एडवोकेट जयेश वाणी यांनी केले होते. आणि दिनेश शेटे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# राष्ट्रवादी शरद पवार गटाने घेतली आयुक्तांची भेट

## कल्याण पश्चिमेतील समस्यांबाबत निवेदन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -

कल्याण : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार कल्याण पश्चिम विधानसभा कार्यकारणीने कल्याण पश्चिम विधानसभेतील नागरी समस्या घेऊन केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांची भेट घेतली.

कल्याण पश्चिम मधील स्टेशन परिसर विभागातील वाहतूक कोंडी, शहरातील स्वच्छता, बंद असलेले ट्राफिक सिग्नल, मांडा टिटवाळा येथे सतत सासणारा कचरा, एमएमआरडीए विभागाकडून टिटवाळा विभागातील अर्धवट रस्ते, शहरातील सर्व स्मारक तसेच चौक उत्तम प्रकारे सुशोभित करणे अशा अनेक विषयावर एक तासभर आयुक्तांनी राष्ट्रवादीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांना वेळ दिला. याप्रसंगी शहर अभियंता अनीता परदेशी तसेच कार्यकारी अभियंता जगदीश कोरे, कार्यकारी अभियंता लोकरे आदी अन्य अधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी आयुक्तांनी अधिकारी वर्गाला समोरासमोर सोक्षमोक्ष करून सकारात्मक पद्धतीने ही कामे हाताळली व पुढील काळात सातत्य ठेवून ही राहिलेली कामे करून घ्यावी असे आश्वासन दिले.

यावेळी विधानसभा अध्यक्ष स्वप्निल रोकडे, विधानसभा कार्याध्यक्ष प्रशांत माळी, जिल्हा उपाध्यक्ष विनायक काळन, ब प्रभाग अध्यक्ष हर्षल सुर्वे, वार्ड अध्यक्ष मदन, तसेच युवकचे पदाधिकारी घुगे व विजय भोरे उपस्थित होते.

### उरणमध्ये निरंकारी मिशन मार्फत आयोजित

# मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर




शिबिरात २३० गरजू नागरिक लाभान्वित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -

कल्याण : संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने रविवारी संत निरंकारी सत्संग भवन, नवीन शेवा, उरण येथे आयोजित मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबिरात २३० नागरिक लाभान्वित झाले.

या शिबिरामध्ये १६ व्यक्तींना मोतीबिंदु झाल्याचे आढळून आले. त्यांना मोफत शस्त्रक्रियेसाठी सरकारी इस्पितळांकडे संदर्भित करण्यात आले. या शिवाय ६७ व्यक्तींना तपासणीनंतर चष्म्यांचे नंबर काढून चष्मे वाढण्यात आले. उर्वरित नागरिकांना तपासणीनंतर डोळ्यांचे आरोग्य सांभाळण्यासाठी मार्गदर्शन व आवश्यक औषधांचे वितरण करण्यात आले.

निरंकारी मिशनचे स्थानिक सेक्टर संयोजक दत्ताराम पाटील व संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या सदस्या प्रेमा ओबेरॉय यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी सेवादल क्षेत्रीय संचालक अशोक केरेकर यांच्यासह उरण क्षेत्रातील सर्व ब्रँच मुखी व सेवादल अधिकारी उपस्थित होते. या शिबिराला सदिच्छा भेट देणाऱ्या मान्यवरांमध्ये शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख मनोहर भोईर तसेच गणेश घरत यांचा समावेश होता. याप्रसंगी त्यांनी मिशनच्या मानवतावादी कार्याचे कौतुक केले. उल्लेखनीय आहे, की या शिबिरात नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईंड आणि आर.ए.पोदार आयुर्वेद मेडिकल कॉलेल, वरळी, मुंबई येथील नेत्र चिकित्सकांनी आपल्या निष्काम सेवा बहाल केल्या. मिशनचे स्थानिक मुखी समीर पाटील यांच्या देखरेखीखाली स्थानिक सेवादल यूनिट व एसएनसीएफचे स्वयंसेवक यांच्या सहयोगाने या शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

# गुरुनाथ सांबरे 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी' पुरस्काराने सन्मानित




दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -

कल्याण : कल्याण तालुक्यातील पोई गावाचे प्रगतशील शेतकरी गुरूनाथ सांबरे यांना रविवारी सन २०२१ चा महाराष्ट्र शासनचा कृषी विभागाचा मानाचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी.राधाकृष्णन यांच्याहस्ते देण्यात आला असून त्यांचे समाजाच्या सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

प्रगतशील शेतकरी गुरूनाथ दत्तात्रय सांबरे हे उच्च शिक्षित असून एमए, बीएड केले असून १५ वर्ष शिक्षक नोकरी केल्यानंतर नोकरीचा राजिनामा देत शेतीला प्राध्यन्य दिले. मेहनत आणि शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करीत आपल्या पिढीजात ५ एकर बागायती तसेच १५ एकर माळरान वरकस शेतीमधून भाजीपाला, स्ट्रॉबेरी, आले, भेंडी, भात पिक, कलिंगड, पिकासाठी रासायनिक खतांचा वापर टाळत सेंद्रिय खताचा वापर करीत जमीन चा पोत ( कस) कायम ठेवत पीके घेतली. तसेच कलमी आब्यांच्या ६० झाडांच्या माध्यमातून आंब्यांचे उत्पादन घेत असून दोन एकर जागेत बांबूची लागवड करून बांबूचे बन तयार केले आहे. सांबरे यांचे १७ सदस्यी एकत्र कुटुंब असून त्या मन्युषबळाचा वापर त्यांनी शेती व्यवसायात केल्याने मजुरी खर्चाचा ताळमेळ साधत शेती व्यवसायात एक एकर पीकातून अडीच ते तीन लाख उत्पन्न मिळवत आहेत. २०२०,२०२१,२०२२ या वर्षातील कृषी विभागाकडून दिला जाणारा पुरस्कार वितरण सोहळा २९ सप्टेंबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी याठिकाणी पार पडला.

सन २०२१ वर्षातील शेतीनिष्ठ शेतकरी या विभागातुन दिला जाणारा पुरस्कार गुरुनाथ सांबरे यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# एमसीएचआयच्या कल्याण डोंबिवली युनिट अध्यक्षपदी राजेश गुप्ता





दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -

कल्याण : महाराष्ट्र चेंबर ऑफ हैसिंग इंडस्ट्रीज कल्याण डोंबिवली युनिटची १४वी वार्षिक सर्वसाधरण मुख्य अतिथी कल्याण डोंबिवली महानरपालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या उपस्थित नुकतीच पार पडली. मावळते अध्यक्ष भरत छेडा यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष राजेश गुप्ता यांच्या हाती सूत्रे दिली. सुनिल चव्हाण यांना सचिव पदावर नियुक्त केले गेले. संयुक्त सचिव साकेत तिवारी आणि राहुल कदम यांची खजिनदार म्हणून नियुक्ती केली गेली. मावळते अध्यक्ष भरत छेडा यांनी त्यांच्या कारकिर्दीतील कामाचा आढावा घेतला.

शहर सौंदर्यकरण अंतर्गत कल्याण डोंबिवली शहरातील २५ रस्ते दुभाजक संस्थेचे सभासद १० ते १२ वर्ष पालिकेच्या देखरेखीखाली करीत आहे. पालिकेच्या सर्व उपक्रमाला एम.सी.एच. आय कल्याण डोंबिवली युनिट हातभार लावत आलेला आहे. रवी पाटील यांनी संघटनेतील सर्व सभासदांना बांधकाम करताना पर्यावरणाच्या समतोल कसा राखावा यावर मार्गदर्शन केले.

नवनिर्वाचित अध्यक्ष राजेश गुप्ता यांनी अध्यक्षीय भाषणात बांधकाम व्यावसायिकांना भेडसावणाऱ्या अडचणी आणि त्या सोडवण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे सांगून सभासदांनी निःसंकोचपणे आपल्या अडचणी सांगण्यात एम.सी.एच.आय युनिट त्या सोडवण्यास कटिबंध आहे असे आश्वासन दिले. अल्ट्राटेक कंपनीतर्फे इमारत बांधकाम साहित्याचे प्रदर्शन आणि माहितीचे प्रदर्शित करण्यात आली. समारंभाची सांगता सहसचिव साकेत तिवारी यांनी सर्व सभासदांचे आणि उपस्थितांचे आभार मानून केले.



## महात्माजी...

शांतमार्गाने सुटतो
कठीण प्रश्न सुध्दा
पटायला हवा मात्र
लाख मोलाचा मुद्दा

आडव्या वाटा नको
रस्ता चांगला साधा
एकजूट हवी अभेद्य
अवघड व्यूव्ह भेदा

मीठ सत्याग्रह बापूं
आठवे पुन्हा एकदा
बापू मुळे शोभे नोट
कींमत नसे कागदा

दीडशे वर्षे रोग जुना
इंग्रजांचा केला खुर्दा
अहिंसक हा योध्दा
कोटीत असे एखादा

शांती अहिंसा जपता
दूर पळतीलं विपदा
मुश्किलीने मिळवली
जपा स्वातंत्र्य संपदा

नव्या स्पर्धा नव युगा
पर्याय नसे गांधीवादा
भारत बनावा विश्वगुरु
परिपूर्ण स्वप्नाचा वादा

## मन सफाई...

गांधीजीची जयंती
हातात घ्यावा झाडू
परिसरी किती घाण
सगळी झाडून काढू

चरखा चालवून पाहू
फोटो झकास काढू
निवडून येऊ नक्की
मनात फुटती लाडू

गांधी वादी आपण
फुकट भाषणे झोडू
आज बापूजी बिझी
एकटे नका बा सोडू

खादी सदरा घालून
बापुंशी नाती जोडू
गांधीजी फक्त माझे
वादात त्यांना ओढू

सव्वा शतका नंतर
बदल लागले घडू
बापूंना प्रिय सफाई
रे स्वप्ने लागली पडू

परिसर साफ झाला
मन अस्वच्छ कडू
कळलेचं नाही बापू
मनी न मारला झाडू

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६..

# खान्देश कुंभार समाज मंडळाचा वार्षिक स्नेह मेळावा संपन्न



कल्याण : खान्देश कुंभार समाज मंडळ कल्याणच्या वतीने वार्षिक स्नेह मेळावा व विद्यार्थी गुणगौरव सोहळा रविवारी संध्याकाळी सिद्धिविनायक हॉल भोईर वाडी कल्याण येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सतीश दरेकर, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शासकीय कामकाज व स्पर्धा परीक्षा शरद वाडेकर हे उपस्थित होते.

भगवान सूर्यवंशी व रघुनाथ कुंभार, रंगराव मोरे, मंडळाचे अध्यक्ष रमेश मोरे,सचिव भगवान कुंभार, आनंद कुंभार, भालेराव, राम पाहणेरकर, भास्कर कल्याणकर, अमोल केमबुंलकर, डॉ.काळे इ.कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेशचे मान्यवर मंचावर उपस्थित होते. समाजातील विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. विशेष सन्मान म्हणून पोलीस उप निरीक्षक म्हणून नियुक्ती झालेले देवानंद चव्हाण यांचा शाल, सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात आले.सूत्रसंचालन निता मोरे, कल्पना बोरसे, नरेंद्र मोरे, विलास मोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी लक्ष्मण पगारे, संजीव सोनवणे, अनिरुद्ध चव्हाण, चेतन मोरे, प्रकाश बोरसे, जगदीश मोरे, मधुकर कुंभार, अर्जुन बोरसे, प्रकाश बोरसे, नारायण महाले, राजाराम बच्छाव, कैलास बच्छाव, विकास मोरे, योगेश मोरे, विजय मोरे, विलास महाले, आत्माराम सोनवणे व समस्त कुंभार समाज मंडळ कल्याणच्या सभासदांनी सहकार्य केले. कल्याण परिसरातील २५० समाजबांधव व भगिनी उपस्थित होते. समाज संघटीत होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन मान्यवरांनी केले. उपस्थितांचे आभार एकनाथ सोनवणे यांनी मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

